विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- dydepune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

---

जा.क्र.उमाशि-४०३/११ वी ऑनलाईन/२०१७/5363
दिनांक - 4 AUG 2017

प्रति,

प्राचार्य,
सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
वरिष्ठ सलग्न कनिष्ठ महाविद्यालये,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र,

**विषयः- इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन २०१७-१८ प्रवेशाबाबत
चौथ्या फेरीतील प्रवेशाच्या वेळापत्रकाबाबत**

**संदर्भः-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६.**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
३) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा पुणे यांचे पत्र जा.क्र. उच्च माध्य-२४१/११.प्रवेश/२०१७/२८८८ दि. २९.०६.२०१७
४) मा. कक्ष अधिकारी , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र जा.क्र.प्रवेश-२०१७/प्र.क्र.१३९/एसडी-२ दि. ०३ ऑगस्ट २०१७

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शासन निर्णयानुसार व मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म. रा. पुणे यांच्या संदर्भ क्र-३ च्या पत्रातील वेळापत्रकानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज सुरु आहे.

यापुर्वी घोषित केल्याप्रमाणे चौथ्या फेरीतील प्रवेशाचे कामकाज दि.०७ व ०८ ऑगस्ट २०१७ रोजी सुरु राहणार होते, तथापि, काही उच्च माध्यमिक विद्यालयांना दिनांक ०७ ऑगस्ट २०१७ रोजी रक्षाबंधन निमित्त सुट्टी असल्याने चौथ्या गुणवत्ता यादीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी सोमवार दिनांक ०७ ऑगस्ट २०१७ ते ०९ ऑगस्ट २०१७ दुपारी २.०० वाजेपर्यंत वेळ वाढवुन देण्यात आली आहे. सदर तीनही दिवस प्रवेशाची सर्व लिंक सुरु राहणार आहेत.

तरी सर्व प्राचार्य यांनी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ११ वी ऑनलाईन कक्षातील सर्व कर्मचा-यांना याबाबत सूचना देवून विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे विहित मुदतीत प्रवेशाची कार्यवाही करुन दिलेले प्रवेश वेळेतच अपडेट करण्यात यावेत. सदर प्रकरणी कोणतीही तक्रार उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे -१

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१
२) .मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१
३) मा. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२